पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.क्रिडा समिती
कार्यपत्रिका क्रमांक :- ७

**सभावृत्तांत**

दिनांक :- ०१ / ०८ / २०१२ वेळ :- दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रिडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक - ०१/०८/२०१२ रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. थोरात वनिता एकनाथ - सभापती

२) मा. पांढरकर निलेश शंकरराव

३) मा. बोकड रामदास गेणभाऊ

४) मा. अप्पा ऊर्फ संपत ज्ञानोबा पवार

याशिवाय मा. कुलकर्णी - सहा.आयुक्त, मा.भंडारे - प्र.उपनगरसचिव, मा.पानसरे - क्रिडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले -**

विषय क्रमांक २ :- शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०११-१२ अनुषंगाने खाजगी शाळांना स्पर्धेचा खर्च अदा करणेबाबत - मा. निलेश पांढरकर, मा.रामदास बोकड यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ३ :- शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१२-१३ आयोजनाकामी येणा-या खर्चाबाबत - मा.रामदास बोकड, मा. संपत पवार यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक १८/०७/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ६) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा. सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक :- १७ विषय क्रमांक :- १
दिनांक :- ०१/०८/२०१२ विभाग :- क्रिडा
सुचक :- मा. रामदास बोकड अनुमोदक :- मा. निलेश पांढरकर
संदर्भ :- मा. महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.क्रिडा/६/कावि/६५७/२०१२, दि. २५/०७/२०१२

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे संत तुकाराम क्रिडा संकूल , इंद्रायणी नगर, भोसरी येथील ॲथलेटिक्स ट्रॅक, हा ॲथलेटिक्स सराव व स्पर्धेसाठी भाडयाने देणेबाबत व प्रस्तावा सोबतचे प्रपत्र अ प्रमाणे अटी व शर्ती व भाडे दर निश्चित करणेस मान्यता देणेकामी मा. विधी समिती मार्फत मा.स्थायी समिती मार्फत मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. विधी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

## सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले -

ठराव क्रमांक :- १८ विषय क्रमांक :- २
दिनांक :- ०१/०८/२०१२
सुचक :- मा. निलेश पांढरकर अनुमोदक :- मा. रामदास बोकड
संदर्भ :- मा. निलेश पांढरकर, मा. रामदास बोकड यांचा प्रस्ताव -

प्रस्तावात नमुद प्रमाणे शासकीय जिल्हास्तर शालेय क्रिडा स्पर्धा २०११ - १२ अनुषंगाने ५१ खेळांपैकी १८ खेळांच्या स्पर्धाचे आयोजन खाजगी शाळांकडे सोपविल्याने त्याकामी त्यांना द्याव्या लागणा-या र.रु. १,२१,८४७/- चे खर्चास मान्यता देणेकामी मा. स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत येत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १९ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- ०१/०८/२०१२
सुचक :- मा. रामदास बोकड अनुमोदक :- मा. संपत पवार
संदर्भ :- मा. रामदास बोकड, मा. संपत पवार यांचा प्रस्ताव -

प्रस्तावात नमुद प्रमाणे जिल्हास्तर शालेय ५० खेळ प्रकारांच्या क्रिडा स्पर्धा २०१२ - १३ आयोजित करणेस व स्पर्धेकामी पी.व्ही.सी.फ्लेक्स, बॅनर, पंच मानधन, पंच चहा - अल्पोपहार खर्च, नारळ, बुके, पुजा खर्च, स्टेशनरी खर्च, साहित्य भाडेपोटी खर्च, प्रेक्षागृह भाडे, इतर खर्च इ. सन २०१२-१३ मध्ये विभागीयस्तर स्पर्धेसाठी म.न.पा.शाळेतील अंदाजे ३०० विद्यार्थी खेळाडू व राज्य पातळीवर १५०, राष्ट्रीय पातळीवर ५० व संघटनेमार्फत आयोजित क्रिडा स्पर्धेसाठी ५० शालेय खेळाडू त्यांच्या समवेत जाणारे क्रिडा शिक्षक व व्यवस्थापक यांचे प्रवास खर्च दैनिक भत्ता, प्रवेश फी, औषध खर्च, इ. अदा करणेकामी अंदाजे र.रु.१,००,०००/- तसेच खाजगी शाळा १२ क्रिडा स्पर्धा आयोजित करणार असल्याने त्यांना स्पर्धेचा खर्च र.रु.८०,७७०/- अदा करणेस असे एकूण येणा-या संभाव्य खर्च र.रु.८,६७,७१०/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास तसेच जिल्हास्तर शालेय

क्रिडा स्पर्धा अनुषंगाने मंडप, बैठक व्यवस्था, ध्वनी / विद्युत व्यवस्था, मैदान तयार करणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, इ. स्वरुपाचा खर्च हा प्रभाग कार्यालयामार्फत होणार आहे. त्यासाठी प्रत्यक्ष येणारा खर्च प्रभागाचे अंदाजपत्रकातून खर्ची टाकणेस, जिल्हास्तर शालेय क्रिडा स्पर्धा अनुषंगाने येणारा खर्च क्रिडा निधी-वार्षिक क्रिडा स्पर्धा, क्रिडा कला साहित्य या लेखाशिर्षावर केलेल्या एकूण तरतूद र.रु.४०,००,०००/- मधून खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**[ थोरात वनिता एकनाथ ]**
सभापती
क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस/४/कावि/१०५३/२०१२
दिनांक :- ०२/०८/२०१२ चे लगत

प्र. उपनगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.